**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल केलेली तक्रार**

**क्र. : मुमाआ-२०२४/नों.क्र.२१३२/त.क्र.१३०/२४**

प्रति,
श्री.मारीया बाबु गायकवाड
रुम नं.६६, सुदामा झोपडी, लाल निगम रोड,
कुलाबा, मुंबई-४०० ००५.

जन माहिती अधिकारी तथा शिधावाटप अधिकारी उपनियंत्रक शिधावाटप
अ परिमंडळ यांचे कार्यालय, अ परिमंडळ, पुरवठा भवन,
५ वा मजला, जनरल नागेश मार्ग, परेल, मुंबई-४०० ०१२.

| | | |
|---|---|---|
| **तक्रारीचा दिनांक** | : | **१५.१२.२०२२** |
| **सुनावणीचा दिनांक** | : | **२४.०४.२०२४** |
| तक्रारदार | : | उपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

तक्रारदार यांनी दि.२०.०९.२०२२ रोजी दाखल केलेल्या द्वितीय अपीलाबाबत अपील क्र.११६७ नुसार श्रीमती ज्योती बसाप्पा गायकवाड यांनी सादर केलेल्या शिधापत्रिकेसाठीचे कागदपत्रांच्या छायांकित प्रत मिळणेबाबत सविस्तर माहिती/छायांकित कागदपत्रांची माहिती मागितलेली असून राज्य माहिती आयोगाने दि.२०.०९.२०२२ रोजीच्या आदेशान्वये जन माहिती अधिकारींना असे आदेश दिले होते की, त्यांनी अपिलकर्तांना माहिती अर्जात मागितलेली माहितीच्या संबंधित कागदपत्रांसह खुलासा १५ दिवसात स्पीड पोस्टने नि:शुल्क पाठवावा. तथापि, अद्याप माहिती मिळाली नसल्याने तक्रारदार यांनी दि.१५.१२.२०२२ रोजी आयोगापुढे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे.

आजच्या तक्रारीच्या सुनावणीच्या वेळी तक्रारदार, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा शिधावाटप अधिकारी श्रीम.सीमा बस्तीकर, प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप नियंत्रक शिधावाटप "अ" परि. परळ श्री.मनोहर कडवे उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी तक्रारदार यांनी सूचीत केले की, द्वितीय अपिल पारित आदेशानुसार तत्कालिन जन माहिती अधिकारींनी माहिती दिली नाही.

सुनावणीच्या वेळी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा शिधावाटप अधिकारी श्रीम.सीमा बस्तीकर यांनी सूचित केले की, तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा शिधावाटप अधिकारी सेवानिवृत्त झाल्या आहेत.

सुनावणीच्या वेळी विद्यमान जन माहिती अधिकारींनी स्पष्ट केले की, आयोगाच्या आदेशानंतर दि.०३-११-२०२२, ०३-०२-२०२३, ०७-०६-२०२३ रोजी पत्र देवून रुम नं.६७ चे रुम नं.६६ करण्याकरीता नमुना अर्ज व सोबत कागदपत्र देण्यात यावी त्या आधारे शिधापत्रिकेवर बदल करता येतो पण तक्रारदारांनी अभिलेख दिले नाहीत म्हणून पुढील कार्यवाही झाली नाही.

सबब, आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

आदेश

अर्जदाराचा तक्रार अर्ज अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

State Information Commission Maharashtra

मुंबई
दिनांक : २४.०४.२०२४

( समीर सहाय )
राज्य मुख्य माहिती आयुक्त